RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३४

दि. २४ मे २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद ११ जून रोजी प्रस्तावित; नव उद्योजकांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढीसाठी ११ जून २०२६ रोजी लातूर येथे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी नव उद्योजकांनी लातूर जिल्हा उद्योग केंद्र लातूर येथे आपल्या नव उद्योग तथा व्यवसायाची माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी केले आहे. या परिषदेचा उद्देश जिल्ह्यातील गुंतवणूक वाढवणे, नवउद्योजकांना आकर्षित करणे आणि गुंतवणूकदार-व्यवसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि लातूर जिल्ह्याला विकासाचा केंद्रबिंदू बनवून जिल्हा आणि राज्याच्या विकासाला चालना देणे हा आहे. या परिषदेमध्ये नव उद्योजकांसोबत सामंजस्य करार होऊन त्यांना एमआययू वितरित केले जाणार आहेत.

## कॉक्रोच जनता पार्टीचे अकाऊंट ब्लॉक करण्यामागे आयबी चा हात, गोपनीय अहवालानंतर पीएम मोदींनीच...; नाना पटोलेंचा खळबळजनक दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** देशात सध्या वाढता असंतोष आणि जनक्षोभ दडपण्यासाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर दडपशाही सुरू असल्याचा थेट आरोप काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी'चे सोशल मीडिया अकाऊंट ब्लॉक आणि हॅक करण्यामागे केंद्रीय गुप्तचर यंत्रणेचा म्हणजेच 'आयबी'चा हात असल्याचा खळबळजनक दावा पटोले यांनी केला असून, यावरून त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर तीव्र शब्दांत प्रहार केला आहे.

नाना पटोले म्हणाले की, देशातील वाढत्या जनक्षोभाची माहिती 'आयबी'ने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली होती. देशातील हा जनतेचा उद्रेक जर वेळीच रोखला नाही, तर परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर जाऊ शकते, असा स्पष्ट इशारा या अहवालात देण्यात आला होता. 'आयबी'ने केंद्र सरकारला दिलेल्या याच गोपनीय अहवालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच हे अकाउंट हॅक केल्याचा दावा पटोलेंनी केलाय.

सोशल मीडियावरील अकाऊंट्स बंद करून किंवा त्यावर बंदी आणून सरकार जनतेचा आवाज दाबू शकत नाही, असा इशारा नाना पटोले यांनी केंद्र सरकारला दिला आहे. ते पुढे म्हणाले, ''पंतप्रधानांनी केवळ विरोधकांचे सोशल मीडिया अकाऊंट्स ब्लॉक करण्यापेक्षा 'आयबी'ला देशातील वास्तविक परिस्थिती विचारली पाहिजे. आज देशातील शेतकरी, तरुण, गरीब आणि बेरोजगार यांच्यात केंद्र सरकारविरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. हा जनक्षोभाचा उद्रेक आता कोणत्याही क्षणी बाहेर येऊ शकतो,'' असे देखील त्यांनी म्हटले.

## काँग्रेसच्या काळातील महागाई जनता अजून विसरलेली नाही भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात

**मुंबई/प्रतिनिधी :** चीनमध्ये पेट्रोल - डिझेलच्या दरात २५ टक्के वाढ झाली आहे. पाकिस्तानात जवळपास १०० टक्के वाढ झाली आहे. श्रीलंकेत लॉकडाऊन लावण्याची वेळ आली आहे. बांगलादेशात काय झाले पहा. राहुल गांधी ज्या चीनचा सातत्याने उदो उदो करतात त्या चीनमध्येही पेट्रोल - डिझेलच्या दरात २५ टक्के वाढ झाली. भारतात फक्त ४ ते ५ टक्के पेट्रोल दरवाढ झाली आहे. २००४ साली मनमोहन सिंग पंतप्रधान होते तेव्हा ४० रुपये लिटर असलेले पेट्रोल ते पायउतार झाले तेव्हा ८५ ते ९० रुपये लिटर म्हणजे दुपटीने वाढले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या काळात सर्वसामान्य जनतेची काळजी घेतली जात आहे. महागाईचा काळ काँग्रेसचाच होता, सामान्य माणूस काँग्रेसच्या काळातील महागाई कधीच विसरणार नाही, अशी तुफानी टीका भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला देशभरातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतोय. त्याच पावलावर पाऊल ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधी बुलेटवरून वर्षा बंगला ते विधान भवन असा प्रवास केला आणि आज एका कार्यक्रमासाठी शिर्डीला जाताना ताफा घेऊन किंवा चार्टरने जाणे टाळून ते सर्वसामान्य नागरिकाप्रमाणे वंदे भारत एक्स्प्रेसने रवाना झाले. जी वंदे भारत एक्स्प्रेस पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या काळात सुरू झाली आणि सर्वसामान्य नागरिक सुसाट प्रवास करत आहेत. आज देवाभाऊ त्याच वंदे भारत एक्स्प्रेसने शिर्डीपर्यंत पोहोचत आहेत. सर्वसामान्यांची काळजी करणे कशाला म्हणतात हे जाणण्यासाठी देवाभाऊंकडे पहा. काँग्रेसने त्यांच्या बुलेट प्रवासावर टीका केली. पण काँग्रेसचा एकतरी नेता ट्रेनने फिरतोय का? काँग्रेसचा एक तरी नेता ताफा कमी करतोय का? काँग्रेसचे नेते सातत्याने उधळपट्टी करतात त्याचवेळी देवाभाऊ पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला केवळ उक्तीतून नव्हे तर कृतीतून प्रतिसाद देत असल्याकडे श्री. बन यांनी लक्ष वेधले.

# डुप्लिकेट सोने दाखवून फसवणूक व गर्दीतून पैसे चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात लातूर स्थानिक गुन्हे शाखेला यश

### ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल व डुप्लिकेट सोन्याचे बिस्कीट जप्त; जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातील ८ गुन्हे उघड




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील विविध भागात नागरिकांची फसवणूक करून सोन्याचे बनावट बिस्कीट विक्रीचा बहाणा करणे तसेच गर्दीच्या ठिकाणी खिसेकापू व चोरी करणारे सराईत तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम व बनावट सोन्याचे बिस्कीट असा एकूण ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात दाखल असलेले तब्बल ८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

श्री.अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. मंगेश चव्हाण,अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यात मालमत्तेविरुद्धचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या आदेशानुसार, पोउपनि श्री प्रमोद देशमुख यांचे पथक तपास करीत होते.

दि. २२ मे २०२६ रोजी बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, औसा-लातूर रोडवरील वासनगाव पाटी परिसरात तीन इसम सोन्याचे डुप्लीकेट बिस्कीट विक्रीसाठी ग्राहकाच्या प्रतीक्षेत थांबले आहेत. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पथकाने घटनास्थळी छापा टाकून तिघा संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी आपली नावे १) बाबाराव सूर्यकांत जाधव (वय ३०) २) केशव छगन जाधव (वय ५०) ३) संदीप दगडू जाधव (वय २९) रा. तिघे रा. सलगरा ता. जि. लातूर अशी सांगितली. त्यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून सोन्याचे मनी मंगळसूत्र, रोख रक्कम तसेच सोनेरी रंगाचे डुप्लीकेट बिस्कीट मिळून आले. पोलिसांनी त्यांना विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी फसवणूक व चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

आरोपींनी महिलांना ''सोन्याचे बिस्कीट'' देण्याचा बहाणा करून त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी केल्याचे सांगितले. तसेच बसस्थानके, सरकारी रुग्णालय परिसर, गर्दीची ठिकाणे व सार्वजनिक कार्यालयांमध्ये नागरिकांच्या खिशातील व पिशवीतील रोख रक्कम चोरी केल्याचेही निष्पन्न झाले.

पोलिसांनी आरोपींकडून गांधी चौक, देवणी, अहमदपूर, शिवाजीनगर, कासार शिरसी, औसा, किनगाव व एमआयडीसी पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्ह्यांतील एकूण १ लाख ७३ हजार रुपयांची रोख रक्कम, २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत ३ लाख ३० हजार रुपये तसेच बनावट सोन्याचे बिस्कीट असा एकूण ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तपासादरम्यान आरोपी संदीप दगडू जाधव हा उदगीर शहर, औसा, देवणी, शिवाजीनगर, उदगीर व चाकूर पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या फसवणुकीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील मुद्देमाल जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन गांधी चौक येथे हजर करण्यात आले आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात श्री. अक्षय जाधव, प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकातील पोउपनि प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार सूर्यकांत कलमे, संजय कांबळे, मोहन सुरवसे, पाराजी पुट्ठेवाड, तुळशिराम बरुरे, गोविंद भोसले, गाडेकर यांनी केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील फसवणूक व गर्दीतील चोरीच्या घटनांना आळा बसण्यास मदत होणार असून नागरिकांनी देखील अनोळखी व्यक्तींनी दिलेल्या आमिषांना बळी न पडता सतर्क राहण्याचे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## इराणवर अमेरिका कोणत्याही क्षणी हल्ला करणार? व्हाईट हाऊसमध्ये वेगवान हालचाली, ट्रम्प यांचे सर्व दौरे रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिका आणि इराणमधील संघर्ष पुन्हा एकदा पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणवर लष्करी हल्ल्याच्या तयारीत असल्याचं समजत आहे. दोन्ही देशांमधील संवादाचा मार्ग अद्याप पूर्णपणे बंद झालेला नाही. मात्र व्हाईट हाऊस आणि पेंटागॉनमध्ये वेगवान हालचाली घडत असून, यामुळे मोठ्या हल्ल्याची तयारी सुरु असल्याची शंका निर्माण होत आहे.

रिपोर्टनुसार, ट्रम्प यांनी शुक्रवारी व्हाइट हाऊसमध्ये आपल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांसोबत आणि लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीला उपराष्ट्रपती जे.डी. व्हान्स, संरक्षण सचिव पीट हेगसेथ, ण्ध्अ संचालक जॉन रॅटक्लिफ आणि चीफ ऑफ स्टाफ सुझी वाइल्स यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रिपोर्टनुसार, अमेरिकन लष्कराने काही जवानांच्या मेमोरिअल डेच्या सुट्ट्याही रद्द केल्या आहेत. तर परदेशात तैनात अमेरिकन लष्कराच्या ठिकाणांसाठी 'रिकॉल रोस्टर' अपडेट केलं जात आहे, जेणेकरुन गरज पडल्यास तात्काळ कारवाई केली जाऊ शकेल. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपले सर्व खासगी कार्यक्रम रद्द केले आहेत. ते जर्सीमधील बेडमिंस्टर गोल्फ क्लबला जाणार होते. मात्र अचानक त्यांनी हा दौरा रद्द केला असून, वॉशिंग्टनला परतले आहेत. इतकंच नाही तर त्यांनी आपला मुलगा ट्रम्प ज्युनिअरच्या विवाहसोहळ्यातही सहभागी होण्याचा कार्यक्रम रद्द केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रूथवर लिहिलं आहे की, ''सरकारी स्थिती आणि अमेरिकेवरील प्रेमाखातर मला व्हाईट हाऊसमध्ये उपस्थित राहणं गरजेचं वाटत आहे''.

दुसरीकडे, ट्रम्प यांचे निकटचे सल्लागार डॅन स्कॅव्हिनो यांनी सोशल मीडियावर ँ-२ स्टिल्थ बॉम्बर्सचा एक व्हिडिओ शेअर केला. अमेरिकन प्रसारमाध्यमांनी असा दावा केला की, यापूर्वीही एकदा अशाच प्रकारचा व्हिडिओ पोस्ट केल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केला होता.

इराणने आपल्या पश्चिम भागातील हवाई क्षेत्र अचानक आणि पूर्णपणे बंद केले आहे. इराणने या निर्णयामागील कारण स्पष्ट केलेलं नाही. मात्र या निर्णयामुळे जगभरात खळबळ उडाली असून, या क्षेत्रात कोणत्याही क्षणी मोठा लष्करी हल्ला होऊ शकतो, अशा चर्चांना उधाण आले आहे. इराणच्या नागरी विमानन प्राधिकरणाने एक नवीन आणि अत्यंत कडक 'ऱ्ध्ऊअश' (वैमानिकांसाठी सूचना) जारी केले आहे. या निर्देशानुसार, इराणने २२ मे ते २५ मे या कालावधीत आपल्या पश्चिम प्रदेशातील हवाई क्षेत्रावर पूर्णपणे निर्बंध लादले आहेत.

या संवेदनशील क्षेत्रात स्थित असलेल्या आठ प्रमुख विमानतळांना आता केवळ दिवसाच कामकाज करण्याची परवानगी असेल. शिवाय, यापूर्वी देण्यात आलेल्या विमानांच्या उड्डाणांच्या सर्व परवानग्या तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आल्या आहेत.

रिपोर्टनुसार, ट्रम्प आता नवीन हल्ल्यांचा गांभीर्याने विचार करत आहेत. मंगळवारी त्यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना आपण मुत्सद्देगिरीला आणखी एक संधी देऊ इच्छितो, असं सांगितले असले तरी गुरुवार रात्रीपर्यंत मात्र त्यांची भूमिका गांभीर्याची झाली होती.

ट्रम्प यांनी शुक्रवारी सांगितलं की, ''इराण करार करण्यासाठी अत्यंत आतुर झाला आहे. आम्ही त्यांना जोरदार तडाखा दिला, आणि आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नव्हता; कारण इराणकडे अण्वस्त्रे असू शकत नाहीत''

## राज्यात अचानक इंधन मागणीत 30 टक्के वाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशभरात गेल्या आठ दिवसांत तिसऱ्यांदा झालेल्या इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य होरपळत असतानाच, राज्यातील ग्रामीण भागात आता गंभीर इंधन टंचाईचे संकट उभे ठाकले आहे. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी शेतकऱ्यांना डिझेल मिळेनासे झाल्याने ग्रामीण भागात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय यंत्रणेला सतर्कतेचे आदेश दिले आहेत. ''राज्यात अचानक पेट्रोल-डिझेलच्या मागणीत २० ते ३० टक्क्यांनी झालेली वाढ संशयास्पद असून, यात काहीतरी मोठी गडबड असण्याची शक्यता आहे,'' अशी शंका व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी अवैध साठेबाजांविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

शनिवारी शिर्डी येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ग्रामीण भागातील इंधन टंचाई आणि वाढत्या गर्दीवर सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ''बळीराजाला ऐन पेरणीच्या तोंडावर डिझेल कमी पडू नये, ही सरकारची प्राथमिकता आहे. मात्र, दरवर्षीच्या तुलनेत अचानक मागणीत ३० टक्क्यांपर्यंत झालेली वाढ सामान्य नाही. शेतकऱ्यांच्या नावाखाली जर कोणी इंधनाची अवैध साठेबाजी किंवा काळाबाजार करत असेल, तर त्यांची अजिबात गय केली जाणार नाही.''

ग्रामीण भागातील गोंधळ आणि गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने आता 'स्मार्ट' मार्ग निवडला आहे. काही जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी ट्रॅक्टर किंवा कृषी पंपांचे 'आरसी बुक' तपासूनच डिझेल देण्यास सुरुवात केली आहे. हाच पॅटर्न आता राज्यभरात प्रभावीपणे राबवण्याचे संकेत मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### शासनाचा मोठा निर्णय.... तहसीलदार गिड्डे यांच्या निधनानंतर....

# नेहा गिड्डे यांना सांगली जिल्ह्यात मिळणार नौकरी

**केज/प्रतिनिधी :** केज येथील तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती निधनानंतर अवघ्या दिड महिन्याच्या आत त्यांच्या पत्नी नेहा राकेश गिड्डे यांना गट क मधील नौकरीची अनुकंपा धर्तीवर संधी दिली आसून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गिड्डे कुटुंबाची भेट घेवून त्यांचे सांत्वन करताना विषेश बाब म्हणुन अनुकंपा धर्तीवर तात्काळ नौकरी देण्याचे दिलेले आश्वासन त्यांनी पाळल्याबद्दल गिड्डे परिवाराच्या वतीने त्यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद देण्यात आले.

दिनांक एप्रिल२०२६ रोजी तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या कारला अंबाजोगाई - लातुर महामार्गांवर भीषण अपघात होऊन त्यात गिड्डे हे जागीच मृत्यू मुखी पडले होते. दरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गिड्डे कुटुंबियांची भेट घेवून त्यांचे सांत्वन करून तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या पत्नी नेहा गिड्डे यांना क गटातील नौकरी अनुकंपा धर्तीवर देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर नेहा गिड्डे यांनी २६ एप्रिल रोजी शासनाकडे अनुकंपा खाली नौकरी ची मागणी केली होती. त्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांचेकडून अहवाल महसूल विभागाला गेल्यानंतर महसूल व वन विभागाचे उप सचिव महेश वरुडकर यांनी पुण्याचे विभागीय आयुक्त यांना पत्र पाठवून विशेष बाब म्हणुन नेहा गिड्डे यांना सांगली जिल्ह्यात क गट संवर्गातील पदावर अनुकंपा योजनेखाली नौकरी देण्याचे सूचित केले आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या भीषण अपघाती निधनानंतर राज्य सरकारने एक अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा निर्णय घेवून पतीच्या अकाली निधनानंतर नेहा गिड्डे यांनी कौटुंबिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक आणि त्यांच्या सुलभतेचा विचार करून बीड ऐवजी सांगली जिल्ह्यात नौकरी करण्यासाठी दि. १७/७/२०२५ च्या निर्णयानुसार विषेश बाब म्हणुन मंजूरी दिली आहे. वन आणि महसूल विभाग व राज्य शासनच्या या निर्णयाचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

### निवासी नायब तहसीलदाराची नौकरी नाकारली

शासनाचे आदेश प्राप्त होताच नेहा गिड्डे यांना मिरज तहसील कार्यालयात निवासी नायब तहसीलदार पदी अनुकंपा योजनेखाली नौकरी देण्याची तयारी शासनाच्या वतीने दर्शविली होती.

परंतु नागरिकांची गर्दी जास्त आसलेल्या पदावर नौकरी करण्याची इच्छा नसल्याचे सांगून त्यांनी ही नौकरी नाकारल्याची माहिती नेहा गिड्डे यांनी दिल्याचे समजते त्यामूळे सार्वजनिक बांधकाम विभाग, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा तहसील कार्यालयात त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना क गटातील पदावरील नौकरी मिळणार आहे.



दिड वर्षाच्या राही या मुलीसोबत नेहा राकेश गिड्डे

संपादकीय...

## लोकचळवळीमुळे समस्या पळ काढतील...

भारताने अमेरिकेतून सन १९५५ मध्ये गव्हाची आयात केली होती. तेव्हा त्याच्यासोबत पार्थे नियम हिस्टेरोफोरस अर्थात गाजर गवत आले होते. भारतात त्याचे आगमन झाल्यावर ते खूपच वेगाने वाढले. म्हणूनच उपरोधिकपणे त्याला लोकांनी काँग्रेस गवत नाव ठेवले. आता गाजर गवत धोक्याचे ठरले असताना जलपर्णीचे संकट जलचर प्राण्यांच्या मृत्यूला आमंत्रण देत आहे. एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या पत्नीने इंग्लंड येथून जलपर्णी वनस्पती १८९० च्या दशकात आणली होती. तिने सर्वप्रथम पश्रि्चम बंगालमधील कोलकाता येथे त्याची बगिचात लागवड केली. त्यानंतर येथील पोषक वातावरण तिला भावले अन् आज जलपर्णी प्रत्येकाच्या मानगुटीवर बसली आहे. जलपर्णीचा विस्तार कसा झपाट्याने होतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण पाहायचे झाल्यास नागपुरातील जनतेने अंबाझरी, कोराडी तलावाची पाहणी करावी. पुण्याची मुळा-मुठा नदी, ठाण्याची उल्हास नदी यासह महाराष्ट्रातील बहुतांश शहरातील तलाव, नद्यांना जलपर्णीने आपल्या कवेत घेतले आहे. गाजर गवताची खासियत म्हणजे ते अमेरिकेच्या मेक्सिकोतून भारतात आल्यावर सर्वप्रथम दुर्दैवाने पुण्यातच आढळले होते. दरम्यान, जलपर्णी ही वायुवेगाने वाढणारी वनस्पती जलचर प्राण्यांसाठी कर्दनकाळ ठरत आहे. तिचे साम्राज्य असेच वाढत राहिल्यास भविष्यात पूरक अन्न म्हणून आपण ज्या मासोळ्यांकडे पाहतो त्या नामशेष होतील. हो, ही बाब शंभर टक्के सत्य असून जलपर्णी जेव्हा वायुवेगाने वाढते तेव्हा पाण्यावर आच्छादन तयार करते. ज्यामुळे सूर्यप्रकाश आणि ऑक्सिजन आत जाऊ शकत नाही. परिणामी जलचर प्राणी तडफडून मरतात. आता सर्वत्र जलपर्णीच राहील तर मासोळ्या, कासव, खेकडे, मगरांसह लाखो जलचर प्राण्यांनी जगावे तरी कसे, हा प्रश्न्न उद्भवला आहे. भीतिदायक म्हणजे जलपर्णी केवळ नागपुरातच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात तिचा वायुवेगाने विस्तार करीत आहे. जलपर्णी ही दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील वनस्पती आहे. सांडपाण्यातील नायट्रोजन, फॉस्फरसमुळे जलपर्णीचा विळखा वाढला आहे. जलपर्णीसाठी सांडपाणी आणि त्यातील मानवी मलमूत्र, साबण पोषक असतात. जलपर्णीचे बीज तयार झाल्यावर ते चिखलात ३० वर्षांपर्यंत टिकून राहते. जलपर्णी दाट प्रमाणात पाण्यावर आच्छादन तयार करते. यामुळे मासोळ्यांना लागणारे अन्न मिळेनासे झाल्याने जलचर प्राणी घटतात. नदीचा प्रवाह खुंटतो. डासांचा प्रादुर्भाव वाढत जातो. डास वाढल्याने मलेरिया, हत्तीपाय, डेंग्यूसारखे आजार मानवासाठी कर्दनकाळ ठरतात. हे धोके असताना काही फायदेही आहेत. त्यानुसार जलपर्णीचा उपयोग कागद तयार करण्यासाठी होऊ शकतो. त्यापासून सेंद्रिय खतही तयार होते. शिवाय त्यापासून चटया, पिशव्या, विविध गृहोपयोगी शोभेच्या वस्तू बनविता येतात. जलपर्णीचा उपयोग बायोगॅस निर्मितीसाठी होऊ शकतो. इराण युद्धामुळे भारतात एलपीजीचा तुटवडा कायम असल्याने बायोगॅसकरिता शासनाने पुढाकार घ्यायला हवा. आता लाभ आणि तोटे समोर आल्याने यासंदर्भात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जलपर्णीने घातलेला मृत्यूचा वेढा आपण संधीत परावर्तित करू शकतो. याकरिताच आता शासनाने संकटातूनही संधी शोधून जलपर्णीचा उपयोग करून घ्यायला हवा. सरकारला शक्य नसल्यास खाजगी कंपन्यांना तिचा उपयोग करण्याची परवानगी द्यायला हवी. ज्या पद्धतीने सापाच्या विषापासूनच औषध तयार करून मानवाचे संरक्षण केले जाते. सापाचे जीवघेणे विष उपयोगी पडू शकते, मग त्याच धर्तीवर जलपर्णीचा सदुपयोग वाढवायलाच हवा. कुठल्याही गोष्टीला विरोध करून लाभ होत नसतात. त्यातील चांगले वाईट गुण हेरून त्यानुसार दिशा ठरवावी लागते. पुढील काळात हीच दिशा ठरविल्यास जलपर्णीचा विळखा लाभदायक ठरेल, जेव्हा चारही बाजूने जलपर्णीची मागणी वाढेल तेव्हा ती वनस्पती आपोआपच संपुष्टात येईल. त्यापूर्वी नदी, नाले आणि तलावात सोडले जाणारे पाणी स्वच्छ असायला हवे. सांडपाणी हे जलपर्णीसाठी पोषक आहे. पण शुद्ध पाण्यात जलपर्णी वाढतच नाही. समजा आपण सांडपाणी तलावात आणि नद्यांमध्ये सोडलेच नाही तर त्याही स्वच्छ राहतील. पर्यायाने जलपर्णी वाढणार नाही. शेवटी, आपण निसर्गाप्रति काही देणे लागतो ना, त्यानुसार जलपर्णीच्या भीतिपोटी कृतीही आपल्या हातून घडेल. गाजर गवत लोकाश्रयातून कमी झाले; तद्वतच जलपर्णीचाही विळखा आपण सहजतेने संपुष्टात आणू शकतो, याची खात्री आहे. कारण जेव्हा केव्हा या भारतात लोकचळवळ सुरू झाली, तेव्हा येथील समस्यांनीच पळ काढला आहे.

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने १७२ व्या विशेष मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने २४ मे २०२६, रविवार ला दुपारी २:३० वाजता, संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे "स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. - डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर (२० जुलै १९४२, नागपूर )" या ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर रमाई स्मृतीदिनानिमित्त सामाजिक




जनजागृतीच्या अनुषंगाने १७२ व्या मोफत वैचारीक प्रबोधनात्मक अभिवादनपर साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.


या कार्यशाळेला जमात इस्लामें हिंदच्या शहर अध्यक्ष शाईस्ता कादरी या उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय उद्योजक मित्र पुरस्कार प्राप्त डॉ. अनिल गायकवाड हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशन चे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत प्रा. शिवम गायकवाड, सोहेल पटेल, राज गायकवाड, सम्यक रामटेके यांचा विशेष सहभाग असणार आहे.

नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. करिता ९९६०३४६०५४, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८, ९८२२७७१९१९, ८६०५४०२२१४. या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते जाणून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# लग्नाच्या १६ दिवसांतच पत्नी गेली माहेरी, पोटगीही मागितली; उच्च न्यायालयाने घेतली पतीची बाजू

**मुंबई/प्रतिनिधी :** घटस्फोटाचे प्रकार वाढत जात असून कौटुंबिक न्यायालय, उच्च न्यायालय आणि अगदी सर्वोच्च न्यायालयातही या प्रकरणाची सुनावणी होते. बदलत्या जीवनशैलीनुसार नातेसंबंधातही मोठे बदल पाहायला मिळत आहेत. त्यामुळे भारतातील सर्वच राज्यांत आता लग्न संस्था अडचणीत आल्याचे चित्र दिसते. न्यायालयासमोर घटस्फोटाची अतिशय विचित्र प्रकरणेही समोर आलेली आहेत. घटस्फोट म्हटले की, महिलेच्या बाजूने कायदे आहेत, असा एक गैरसमज समाजात असतो. मात्र न्यायालय महिला आणि पुरुष असा भेद न करता कायद्याच्या कसोटीवर जे बरोबर आहे, त्या बाजूने निकाल देते. पंजाबमधील असेच एक प्रकरण समोर आले आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने एका घटस्फोट प्रकरणात वैवाहिक खटला हस्तांतरित करण्याची पत्नीची मागणी फेटाळून लावली. पतीने विवाह रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली होती. मात्र पत्नीने सदर याचिका जवळ असलेल्या न्यायालयात हस्तांतरित करण्याची मागणी केली. मात्र पती नैराश्य आणि चिंताग्रस्त असल्यामुळे न्यायालयाने हस्तांतरणाची मागणी फेटाळली. न्यायमूर्ती निधी गुप्ता यांच्या एकलपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. हिंदू विवाह कायद्याच्या कलम १२ (विवाह रद्द करणे) नुसार पतीने दाखल केलेली याचिका पतियाळाहून जालंधरला हस्तांतरित करावी, अशी मागणी पत्नीने केली होती. या याचिकेवर न्यायालयात सुनावणी पार पडली. विभक्त झालेल्या जोडप्याचे लग्न केवळ १६ ते १७ दिवसच टिकले होते. न्यायालयात पक्षकारांनी बाजू मांडली. पत्नीने स्वत:ला बेरोजगार असल्याचे सांगून ती आई-वडिलांवर अवलंबून असल्याचे म्हटले. तसेच तिचा विभक्त पती पंजाबी चित्रपट आणि संगीत उद्योगात काम करत असून तो महिन्याला दीड ते दोन लाख रुपये कमावतो. मात्र तरीही पोटगी देण्यास त्याचा विरोध असल्याचे नमूद करण्यात आले.

# कॉक्रोच जनता पक्ष : व्यवस्थेच्या अंधाऱ्या कोपऱ्यातून उठलेला जनतेचा आवाज
## जनतेला आता फक्त घोषणांची नाही, तर प्रामाणिक पर्यायाची गरज आहे









आजच्या भारतीय राजकारणात पक्षांची संख्या वाढत चालली आहे, पण विचारांची उंची मात्र दिवसेंदिवस खुजी होत असल्याची भावना सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे. प्रत्येक निवडणुकीत नवे चेहरे, नवे घोषवाक्य आणि नव्या आश्वासनांचा पाऊस पडतो, पण निवडणूक संपली की जनतेच्या वाट्याला पुन्हा तीच निराशा, तोच भ्रष्टाचार आणि तीच सत्तेची मस्ती येते. अशा काळात एखादा पक्ष स्वतःला "कॉक्रोच जनता पक्ष" असे नाव देतो आणि संपूर्ण व्यवस्थेलाच अस्वस्थ करून टाकतो, ही घटना साधी नाही. ती केवळ राजकीय प्रयोगाची गोष्ट नाही, तर ती समाजाच्या अंतर्मनात साचलेल्या संतापाची, उपेक्षेची आणि व्यवस्थेविरुद्धच्या बंडाची जाहीर अभिव्यक्ती आहे. अभिजीत दपके यांनी मांडलेली ही संकल्पना सुरुवातीला अनेकांना विनोदी किंवा उपहासात्मक वाटली असेल पण तिच्यामागील प्रतीकात्मकता अत्यंत अस्वस्थ करणारी आहे. कॉक्रोच म्हणजे असे जीव, जे कितीही मारण्याचा प्रयत्न केला तरी पुन्हा उभे राहतात. अंधाऱ्या गटारात, घाणीमध्ये, विषारी वातावरणातही जगण्याची क्षमता ठेवतात.

आजचा सामान्य नागरिकही काहीसा तसाच झाला आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, जातीय ध्रुवीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शिक्षणाचे व्यापारीकरण आणि आरोग्य व्यवस्थेतील असमानता यामध्ये तो अक्षरशः गुदमरतो आहे पण तरीही जगतो आहे, संघर्ष करतो आहे आणि पुन्हा उभा राहतो आहे. या संकल्पनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याने समाजाच्या जखमेवर थेट बोट ठेवले आहे. अनेक दशकांपासून राजकारणात "गरीब", "शोषित", "वंचित" या शब्दांचा वापर केवळ मतांसाठी झाला पण त्या वर्गांच्या आयुष्यात मूलभूत बदल फारसा घडला नाही. उलट, सत्ताधारी बदलले, चेहरे बदलले, झेंडे बदलले पण जनतेचे प्रश्न तसेच राहिले. अशा परिस्थितीत "आम्हीच ते कॉक्रोच आहोत, ज्यांना तुम्ही कायम तुडवत आलात" असे म्हणण्याचे धाडस ही केवळ राजकीय घोषणा नाही, तर व्यवस्थेविरुद्धचा मानसिक उठाव आहे. याच कारणामुळे इतर राजकीय पक्षांना या संकल्पनेची धास्ती वाटू लागली आहे. कारण पारंपरिक पक्षांचे राजकारण हे प्रतिमांवर चालते. त्यांना भव्य कार्यालये, मोठमोठे मंच, करोडो रुपयांच्या जाहिराती आणि सोशल मीडियावरील कृत्रिम लोकप्रियता आवश्यक असते. पण कॉक्रोच जनता पक्षाची ताकद ही या झगमगाटात नाही. त्याची ताकद आहे ती उपेक्षितांच्या वेदनेत. ज्याच्याकडे काही गमावण्यासारखे नसते, तोच सर्वात धोकादायक ठरतो.

आज लाखो युवक बेरोजगारीमुळे त्रस्त आहेत. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. मध्यमवर्ग करांच्या आणि महागाईच्या चक्रव्यूहात अडकला आहे. अशा प्रत्येक व्यक्तीला या प्रतीकात स्वतःचा चेहरा दिसू लागला, तर ही केवळ राजकीय चळवळ राहणार नाही तर ती सामाजिक असंतोषाची लाट बनेल. आजच्या काळात लोकशाहीची सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे जनतेच्या भावनांचे व्यवस्थापन. राजकीय पक्ष लोकांच्या प्रश्नांपेक्षा त्यांच्या भावना पेटवण्यात अधिक व्यस्त दिसतात. धर्म, जात, भाषा आणि प्रादेशिक अस्मिता यांच्या आधारावर मतांचे गणित मांडले जाते. पण पोटाची भूक, नोकरीची चिंता आणि जगण्याचा संघर्ष यांना कोणताही धर्म नसतो. कॉक्रोच जनता पक्षाने नेमके हेच वास्तव उघडे केले आहे. त्यामुळे त्याच्याकडे लोक केवळ विनोद म्हणून पाहत नाहीत, तर एक अस्वस्थ प्रश्न म्हणून पाहू लागले आहेत. या संकल्पनेत एक प्रकारची उपरोधिक क्रांती दडलेली आहे. समाजात ज्यांना "घाण", "निकृष्ट", "तुच्छ" मानले जाते, त्याच प्रतीकाला पक्षाचे नाव देणे म्हणजे व्यवस्थेच्या अभिजन मानसिकतेलाच आव्हान देणे होय. भारतीय समाजात आजही वर्गभेद आणि श्रेष्ठत्वाची भावना खोलवर रुजलेली आहे. राजकारणातही काही विशिष्ट घराणी, आर्थिक गट आणि प्रभावशाली लोकच केंद्रस्थानी राहतात. सामान्य माणूस फक्त मतदानापुरता महत्त्वाचा असतो. पण "कॉक्रोच" हे प्रतीक म्हणते की, तुम्ही आम्हाला कितीही तुच्छ लेखले तरी आम्ही नष्ट होणार नाही.

इतर पक्षांना याची धास्ती वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे ही संकल्पना सोशल मीडियाच्या काळात झपाट्याने लोकांपर्यंत पोहोचू शकते. आजची तरुण पिढी पारंपरिक भाषणांपेक्षा प्रतीकांना अधिक वेगाने समजते. एक धारदार नाव, एक ठोस संदेश आणि व्यवस्थेविरुद्धचा रोष, एवढेच एखाद्या चळवळीला पुरेसे ठरते. त्यामुळेच अनेक प्रस्थापित पक्ष या विचाराकडे उपहासाने पाहत असले, तरी त्यांच्या मनात अस्वस्थता आहे. कारण इतिहास सांगतो की, सुरुवातीला हास्यास्पद वाटलेल्या अनेक चळवळी पुढे मोठ्या परिवर्तनाचे कारण ठरल्या आहेत. तथापि, कोणतीही चळवळ केवळ प्रतीकांवर टिकत नाही. तिच्यामागे स्पष्ट विचार, धोरणे आणि सामाजिक बांधिलकी असावी लागते. कॉक्रोच जनता पक्षालाही हीच कसोटी पार करावी लागेल. केवळ व्यवस्थेविरोधातील संताप पुरेसा नसतो, तर त्याला सकारात्मक दिशा द्यावी लागते. अन्यथा अशा चळवळी काही काळ चर्चेत राहतात आणि नंतर विस्मृतीत जातात. जनतेला आता फक्त घोषणांची नाही, तर प्रामाणिक पर्यायाची गरज आहे.

आज भारतातील राजकीय व्यवस्थेला सर्वाधिक भीती कोणाची वाटते, तर ती जागृत नागरिकांची. कारण जागृत नागरिक प्रश्न विचारतो. तो जातीच्या, धर्माच्या किंवा भावनिक घोषणांच्या पलीकडे जाऊन विकास, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराचा हिशोब मागतो. कॉक्रोच जनता पक्षाची संकल्पना ही अशाच जागृतीची सुरुवात ठरू शकते. ती समाजाला आरसा दाखवते की, आपण ज्या लोकांना कायम उपेक्षित ठेवले, त्यांच्याच वेदना उद्या व्यवस्थेविरुद्धचा ज्वालामुखी बनू शकतात. या पक्षाच्या वाढत्या लोकप्रियतेने राजकीय वर्तुळात खळबळ! अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील "कॉक्रोच जनता पक्ष" सोशल मीडियावर प्रचंड वेगाने पुढे येत आहे. काही वृत्तांनुसार या पक्षाचे इन्स्टाग्राम अकाऊंटवर १ कोटीपेक्षा अधिक फॉलोअर्स झाले असून त्यांनी भाजप आणि काँग्रेससारख्या पारंपरिक पक्षांनाही मागे टाकल्याची चर्चा रंगली आहे. भाजपचे सुमारे ८७ लाख तर काँग्रेसचे सुमारे १.३ कोटी फॉलोअर्स असल्याचे विविध माध्यमांतून समोर आले आहे.

दरम्यान, अभिजीत दिपके यांना कथितरित्या धमकीचे फोन आणि मेसेज आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. "अकाउंट बंद कर, नाहीतर तुला अमेरिकेत जिवंत ठेवणार नाही" तसेच "तुझ्या संभाजीनगर येथील घराचा पत्ता मिळाला आहे" अशा स्वरूपाच्या धमक्या त्यांच्या मोबाईलवर आल्याचा दावा करण्यात आला आहे. यावर प्रतिक्रिया देताना दिपके यांनी भीती न बाळगता, "आवाज दाबण्याचा प्रयत्न होतोय, पण आम्ही मागे हटणार नाही," असा ठाम संदेश दिल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे. लोकशाहीत मतभेद असू शकतात, पण धमक्या देऊन आवाज दाबण्याची प्रवृत्ती ही अत्यंत चिंताजनक आहे. लोकशाहीत विरोधी आवाज महत्त्वाचा असतो. तो कितीही विचित्र, उपरोधिक किंवा अस्वस्थ करणारा असला तरी त्यामागील वेदना समजून घेणे आवश्यक असते. अन्यथा समाजातील असंतोष दबला जातो आणि नंतर तो अधिक तीव्र स्वरूपात उद्रेक होतो. कॉक्रोच जनता पक्ष हा कदाचित एखादा औपचारिक राजकीय पक्ष नसेल, पण तो आजच्या व्यवस्थेविरुद्ध निर्माण झालेल्या मानसिक बंडाचे प्रतीक नक्कीच आहे.

भारतीय राजकारणाने जर या संदेशाकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर उद्याच्या काळात लोकांचा संताप कोणत्या रूपात समोर येईल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे. कारण इतिहासाचा एक नियम आहे, जेव्हा व्यवस्थेने सामान्य माणसाला वारंवार तुडवले, तेव्हा तोच माणूस एका दिवसात परिवर्तनाचा केंद्रबिंदू बनला. आणि कदाचित म्हणूनच "कॉक्रोच जनता पक्ष" या नावाने आज अनेकांच्या चेहऱ्यावर हसू येत असले, तरी सत्तेच्या गलियाऱ्यात मात्र अस्वस्थ शांतता पसरली आहे. आज जनता हसत आहे की विचार करत आहे, हे सत्ताधाऱ्यांनी ओळखण्याची वेळ आली आहे. कारण इतिहास साक्षी आहे, जेव्हा उपेक्षितांचा आवाज प्रतीक बनतो, तेव्हा परिवर्तनाची चाहूल लागलेली असते. "कॉक्रोच जनता पक्ष" ही कदाचित केवळ एका नावाची चर्चा नाही तर ती व्यवस्थेविरुद्ध साचलेल्या जनआक्रोशाची सावली आहे. आज तो सोशल मीडियावर दिसतो आहे, उद्या तो रस्त्यावर उतरला तर आश्चर्य वाटायला नको. कारण लोकशाहीत सर्वात मोठी ताकद ही सत्तेची नसते, ती जागृत जनतेची असते.



**प्रवीण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

## विविध वृत्त...

### नातवाने आजीची गळा चिरुन केली हत्या, डेबिट कार्डवरुन झालेल्या भांडणाने नातंच संपवलं; नागपुरातील घटना

**मुंबई/प्रतिनिधी ::** नातवानेच आपल्या आजीची निर्दयीपणे हत्या केल्याच्या घटनेमुळे नागपुरात खळबळ उडाली आहे. पाचपावली पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली आहे. आरोपी नातवाने ६५ वर्षीय आजीची चाकूने गळा चिरुन हत्या केली. घटनेची माहिती मिळताच पाचपावली पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. पोलिसांनी अर्ध्या तासातच आरोपीला ताब्यात घेतलं आहे. प्राथमिक तपासात डेबिट कार्डच्या वापराच्या संशयातून हा खून झाल्याचे समोर आले आहे.

नागपुरात तरुणाने स्वत:च्या चुलत आजीची गळा चिरून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. मृत महिलेची ओळख इंदू चव्हाण (वय ६५) अशी असून त्या पाचपावली परिसरात राहत होत्या. गुरुवारी सकाळच्या सुमारास पाचपावली पोलिस स्टेशनला एका घराचे दार बाहेरून कुलूपबंद असून घरातून दुर्गंधीयुक्त वास येत असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घराचे दार उघडून आत प्रवेश केला असता, इंदू चव्हाण यांचा मृतदेह घरामध्ये आढळून आला. मृतदेहाजवळ रक्त सांडलेलं होतं.

प्राथमिक तपासात त्यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर पोलिसांनी परिसरात तपास सुरू करत तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनीय माहितीच्या आधारे संशयिताचा शोध सुरू केला.तपासादरम्यान मृत महिलेच्या चुलत नातवावर पोलिसांचा संशय बळावला. चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली. पोलिसांच्या माहितीनुसार, इंदू चव्हाण यांना आरोपी त्यांच्या नकळत डेबिट कार्डचा वापर करत असल्याचा संशय होता. या कारणावरून दोघांमध्ये वारंवार वाद होत होता. घटनेच्या दिवशीही याच मुद्द्यावरून दोघांमध्ये जोरदार वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर संतापाच्या भरात आरोपीने चाकूने इंदू चव्हाण यांच्यावर हल्ला केला व त्यांचा गळा चिरून खून केल्याचे समोर आले आहे.घटनेची माहिती मिळाल्यानंतर पाचपावली पोलिसांनी जलद गतीने तपास करत तांत्रिक पुराव्यांच्या आधारे अवघ्या अर्ध्या तासात आरोपीला ताब्यात घेतले.

पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला या प्रकरणाचा अधिक तपास पाचपावली पोलिस करत आहेत.

### चीनमध्ये कोळसा खाणीत भीषण गॅस स्फोट; ८२ कामगारांचा मृत्यू, ९ जण अजूनही बेपत्ता

बिजिंग : चीनमधील एका कोळशाच्या खाणीत झालेल्या भीषण स्फोटात किमान ८२ जणांचा मृत्यू झाला असून नऊ जण अद्याप बेपत्ता आहेत, अशी माहिती अधिकृत वृत्तांद्वारे समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांतील या अत्यंत भीषण खाण अपघातानंतर, बेपत्ता कामगारांचा शोध घेण्यासाठी प्रशासनाकडून बचाव कार्य वेगाने सुरू आहे.शांक्सी प्रांतातील टोंगझोऊ ग्रुपच्या लियुशेन्यू कोळशाच्या खाणीत झालेल्या गॅस स्फोटाच्या ठिकाणाहून मि ळालेल्या माहितीनुसार, या अपघातात ८२ जणांचा मृत्यू झाला आहे, असे वृत्त शिन्हुआ या वृत्तसंस्थेने दिले आहे. स्फोट शुक्रवारी संध्याकाळी झाला. हा स्फोट स्थानिक वेळेनुसार शुक्रवारी संध्याकाळी १९:२९ वाजता (११:२९ उश्ऊ) झाला.वृत्तानुसार, दुर्घटना घडली तेव्हा खाणीत २४७ कामगार कर्तव्यावर होते. बचाव पथके जिवंत राहिलेल्या लोकांचा शोध घेत असल्याने आणि खाणीतील परिस्थितीचा आढावा घेत असल्याने घटनास्थळी बचाव कार्य अजूनही सुरू आहे. ही घटना गेल्या काही महिन्यांतील सर्वात भीषण खाण अपघातांपैकी एक मानली जात आहे.या स्फोटानंतर चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी वाचलेल्यांना वाचवण्यासाठी आणि जखमींवर उपचार करण्यासाठी सर्व शक्य प्रयत्न करण्याचे आवाहन केले. त्यांनी प्रशासनाला खाणीतील मदत कार्य कोणतीही कसर न सोडता राबवण्याचे निर्देश दिले.

### ऐश्वर्या राय बच्चननं कान फिल्म फेस्टिवलमध्ये रेड कार्पेटवर केली धमाकेदार एंट्री...

हैदराबाद : हिंदी चित्रपटसृष्टीची सौंदर्यवती ऐश्वर्या राय बच्चनचा कान फिल्म फेस्टिवल २०२६ मधील फर्स्ट लूक समोर आला आहे. नेहमीप्रमाणेच, ऐश्वर्यान तिच्या गोड अंदाजानं रेड कार्पेटवर सर्वांना थक्क केलं. यावेळी या अभिनेत्रीनं एक आकर्षक निळ्या रंगाचा गाऊन परिधान केला होता. यामध्ये ती खूप सुंदर दिसत होती. रेड कार्पेटवर ऐश्वर्यानं आपल्या सौंदर्यानं सर्वांना मोहित करून टाकलं होतं. चाहते कानच्या पहिल्या दिवसापासून ऐश्वर्याच्या लूकची वाट पाहत होते. आता हा लूक समोर आल्यानं तिच्या फोटोंना अनेकजण पसंत करत आहे. ऐश्वर्याचा रेड कार्पेट लूक सोशल मीडियावर सर्वत्र पसरला आहे. ऐश्वर्या राय बच्चनच्या लूकची आता सर्वत्र चर्चा होत आहे. आता सोशल मीडियावर अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. तसेच ऐश्वर्याला 'कान क्वीन' म्हणूनही ओळखले जाते.

ऐश्वर्या राय बच्चनचा लूक : ऐश्वर्या अनेक वर्षापासून कान चित्रपट महोत्सवाच्या रेड कार्पेटवर आपल्या सौंदर्यानी सर्वांना चकित करत आहे. ऐश्वर्या राय बच्चन यावेळी नेहमीप्रमाणेच सुंदर आणि मनम ोहक लूकनं सर्वांची मने जिंकली. तसेच या सोहळ्यात जॅकलिन फर्नांडिसपासून ते उर्वशी रौतेलापर्यंत अनेक अभिनेत्रींनी कान २०२६ मधील आपलं लूक आधीच रेड कार्पेटवर सादर केलंय आहेत. दरम्यान ऐश्वर्याच्या रेड कार्पेट लूकबद्दल सांगायचं झालं तर, तिनं सिक्विनचे ??काम असलेला एक आकर्षक निळ्या रंगाचे इलेक्ट्रिक गाऊन परिधान केला होता. हा गाऊन अमित अग्रवाल यांनी डिझाइन केला असून यावर तिनं मॅचिंग दुपट्टाही घातला होता.

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करेण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जे दार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

**केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम**

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

**शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात**

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे:

एम.डी. सायकिॲट्री

एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी

एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क

डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग

हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**नागपूर येथे एम.डी. सायकिॲट्रीला सुरुवात**

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिॲट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

**नर्सिंग क्षेत्रातही प्रगती**

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे.

या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार.

महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाची पक्ष बांधणी व संघटन संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



**केज/प्रतिनिधी :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दिनांक २२ मे २०२६ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाची पक्ष बांधणी व संघटन, मजबुतीकरण संदर्भातील महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या बैठकीमध्ये पक्ष विस्तार, नवीन कार्यकर्त्यांची निवड, आगामी संघटनात्मक कार्यक्रम तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब पवार यांच्या दौऱ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मराठवाडा अध्यक्ष भगवंत(आप्पा)वायबसे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन करत पक्षाची विचारधारा गावागावात पोहोचविण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

तसेच केज तालुका अध्यक्ष आश्रुबा(दादा) खरात यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीस उपस्थित सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व युवा सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## कांदा बियाणे घेताना जरा जपूनच !

**अहिल्यानगर :** शेतकऱ्यांवर आधीच अनेक संकट असताना शेतकरी राजा पुन्हा एकदा सापडला आहे. कारण बाजारात अनेक ठिकाणी बनावट व भेसळयुक्त कांदा बियाण्यांची विक्री होत आहे. रब्बी कांदा बियाण्यांमध्ये खरीप कांदा बियाण्यांची भेसळ करून शेतकर्यांची फसवणूक केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन जणांविरूध्द फसवणूक व अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे पुन्हा एकदा निकृष्ट व परवानाविना विक्री होर्णाया बियाण्यांच्या प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत बीज निरीक्षक तथा कृषी अधिकारी बाळासाहेब रामचंद्र कांबळे यांनी बुधवारी फिर्याद दिली. त्यानुसार पाडळी शिंदे (ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) येथील मे. यमुनाई फार्मर प्रोड्युसर कंपनीचा संचालक सुरज शिवानंद शिंदे आणि शिंगवे नाईक (ता. अहिल्यानगर) येथील श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्राचा मालक निखील गोविंद पाटील यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी शिंगवे नाईक येथील श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्र येथे तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान संबंधित विक्रेत्याकडे आवश्यक परवाना नसताना बियाण्यांची विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले. तपासादरम्यान रब्बी कांदा बियाण्यांमध्ये खरीप कांदा बियाण्यांची भेसळ आढळून आली. या भेसळीमुळे कांदा उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाली असून अनेक शेतकर्यांचे



आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. संबंधित संशयित आरोपींनी बियाणे शेतकऱ्यांना विक्री केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात (श्इ्ण इदत्म एूगदह) विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे करीत आहेत.

शेतकऱ्यांची दिशाभूल केल्यास कायदेशीर कारवाई

दरम्यान, बियाणे विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची अनधिकृत आणि बेकायदेशीर बाब खपवून घेतली जाणार नाही. ज्या कृषी सेवा केंद्र चालकांकडे वैध परवाना नाही किंवा जे चालक परवान्यात नसलेल्या कृषी निविष्ठाची विक्री करतील, त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. शेतकर्यांना देण्यात येणार्या प्रत्येक बिलावर बियाण्याचा प्रकार, जात आणि लॉट नंबर अचूक असणे बंधनकारक आहे. बिलांमध्ये फ ेरफार करून किंवा चुकीची जात लिहून शेतकर्याची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्यास परवाना रद्द करण्यासोबतच प्रशासकीय व कायदेशीर कारवाईला करणार असल्याचा इशारा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिला आहे.

## पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कारासह अन्य पुरस्कारांचे वितरण

**मुंबई/प्रतिनिधी :** सामाजिक, सांस्कृतिक, कला आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिल्या जाणाऱ्या 'पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कार' तसेच विविध मानाच्या पुरस्कारांचे वितरण प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाले. इंटरनॅशनल थिएटर अँड स्पोर्ट्स फाउंडेशन () आणि साईदिशा प्रतिष्ठान मार्फत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजसेवक दत्तात्रय बाळकृष्ण माने यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाला कला, क्रीडा, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

अभिनेते बोमन इराणी यांना अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि मुंबई पोलीस दलातील उप आयुक्त बजरंग बनसोडे यांना 'रणझुंजार पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगमंच आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील आणि एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांना 'सेवा रत्न पुरस्कार' देण्यात आला.

'महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार' संतोष लक्ष्मण जाधव, डॉ.सायली पालखेडकर, क्रिकेटपटू आयुष म्हात्रे, डॉ. मंजू मंगल प्रभात लोढा यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांना आयटीएसएफचा जीवन गौरव पुरस्कार यांना प्रदान करण्यात आला. 'ज्वेल ऑफ इंडिया अवॉर्ड' क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांना प्रदान करण्यात आला.

गायक हर्षद गोळेकर आणि दुहिता गोळेकर, शहजाद अली यांना पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कार देण्यात आला. रायझिंग स्टार अवॉर्ड गायक जेटशेन लामा, गायक देवानश्रीया के. यांना देण्यात आला. कला रत्न पुरस्काराने चित्रकार शेखर साने यांना गौरवण्यात आले. सुहाना ग्रुपचे विशाल चोरडिया यांना 'उद्योग रत्न' पुरस्कार देण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्यात कालीपुत्र कलिचरण महाराज यांनी शिवस्रोत पठण केले. घाटकोपर येथील विशेष मुलांनी विशेष सादरीकरण केले.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान मुंबईकर प्रेक्षकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याचे साईदिशा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय माने यांनी सांगितले.

# शासकीय, खासगी कर्करोग रुग्णालये व सेवाभावी संस्थांनी कर्करोगविरोधी लढ्यात एकजूटीने सहभागी व्हावे : सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई/प्रतिनिधी :** कर्करोग विरोधी लढाईत शासकीय यंत्रणेबरोबरच खासगी कर्करोग रुग्णालये, कर्करोग तज्ज्ञ, सेवाभावी संस्था यांचा सहभाग महत्वाचा असल्याचे प्रतिपादन आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी केले आहे.

आरोग्यसेवा आयुक्तालय मुंबई येथे आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, ऑन्कोसर्जन, तज्ज्ञ प्राध्यापक, कर्करोग उपचार क्षेत्रातील काम करणा-या टाटा, रिलायन्स, लिलावती व इतर खाजगी रुग्णालयांचे प्रतिनिधी, शासकीय व खासगी रुग्णालयांतील कर्करोग उपचार तज्ज्ञ, सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी तसेच दक्षिण कोरियातील आयएमबी संस्थेचे तज्ज्ञ दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, शहरी आरोग्य आयुक्त सुनील भोकरे आणि उपसचिव विलास बेंद्रे उपस्थित होते.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, कर्करुग्ण संख्या वाढत आहे. कर्करोग उपचारांमध्ये अर्ली डिटेक्शन म्हणजेच सुरुवातीच्या टप्प्यात निदान होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्करोग प्रारंभीच्या अवस्थेत आढळल्यास रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे राज्यभर जनजागृती, निदान व उपचार या त्रिसूत्रीच्या आधारे कर्करोगा विरोधात लढाई सुरू आहे. कर्करोग तपासणीसाठी राज्यातील आठ परिमंडळात प्रत्येक एक कर्करोग निदान व्हॅन द्वारे तपासणी सुरू असून, आतापर्यंत तीन कोटीपेक्षा अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली आहे. कर्करुग्णांच्या उपचारासाठी राज्यात २७ ठिकाणी डे केअर युनिट सुरू करण्यात येत आहेत.




राज्यात १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू असून गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी ही मोहीम आहे. कर्करोग उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत उपचार पॅकेजचे पुनरावलोकन करण्यात आले असून रेडिओथेरपी, केमोथेरपी, इम्युनोथेरपी, पीईटी स्कॅन यांसारख्या उपचारांचा अधिक व्यापक समावेश करण्याचे शासनाचे नियोजन आहे. तसेच महाराष्ट्र कर्करोग वॉरियर्स () या उपक्रमाच्या माध्यमातून तज्ज्ञ ऑन्कोलॉजिस्टच्या मदतीने निदान व उपचार सेवा उपलब्ध करून दिली जाते.

सर्व प्रकारच्या कर्करोगाचे लवकर आणि अचूक निदान करण्यासाठी जगातील काही देशात लिक्विड बायोप्सी तंत्रज्ञान वापरले जाते. या तंत्रज्ञानाबाबतचे दक्षिण कोरियामधील आयएमबी संस्थेच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन करण्याच्या सूचना बैठकीत करण्यात आल्या.

कर्करोग निर्मूलनाच्या कार्यात सार्वजनिक आरोग्य विभागाबरोबरच सर्व खासगी रुग्णालये, तज्ज्ञ डॉक्टर, सेवाभावी संस्था यांनी एकत्रितपणे काम केल्यास कर्करोग निर्मूलनाचा संकल्प निश्चितच पूर्ण होईल, असा विश्वास आरोग्य मंत्री श्री आबिटकर यांनी व्यक्त केला.

# संरक्षण दलातील प्रशिक्षण, दुखापत प्रतिबंध आणि कार्यक्षमता वाढीसाठी क्रीडा फिजिओथेरपी महत्त्वाची : डॉ. विजय त्रिपाठी

## सीआरपीएफ प्रशिक्षण केंद्रात क्रीडा फिजिओथेरपी शिबिर

**लातूर/प्रतिनिधी :** संरक्षण दल हे देशाच्या सुरक्षेचे प्रमुख आधारस्तंभ असून सैनिकांना अत्यंत कठोर शारीरिक व मानसिक परिस्थितींमध्ये कार्य करावे लागते. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण वैज्ञानिक, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम पद्धतीने होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणादरम्यान होणाऱ्या दुखापती टाळण्यासाठी तसेच सैनिकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी क्रीडा फिजिओथेरपीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रीडा फिजिओथेरपी विभागाचे प्रमुख डॉ. विजय त्रिपाठी यांनी केले.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) प्रशिक्षण केंद्र, लातूर येथे आयोजित क्रीडा फिजिओथेरपी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिरात डॉ. विजय त्रिपाठी बोलत होते. यावेळी सीआरपीएफचे





पोलिस उप महानिरीक्षक ए. एच. अन्सारी, वरिष्ठ पोलिस अधिकारी प्रशांत राय, सहयोगी प्रा. डॉ. मेघा बक्षी तसेच प्रशासकीय अधिकारी सत्यवान झरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विजय त्रिपाठी यांनी संरक्षण दलातील विविध प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती दिली. ते म्हणाले की, सैनिकांना धावणे, वजन प्रशिक्षण, अडथळा शर्यती, पोहणे, पर्वतारोहण, सहनशक्तीवर्धक व्यायाम यांसह युद्ध प्रशिक्षण, शस्त्र हाताळणी, रणनिती सराव आणि मानसिक स्थैर्य विकसित करणाऱ्या कठोर प्रशिक्षणातून जावे लागते. या प्रशिक्षणामुळे सैनिकांची शारीरिक क्षमता, वेग, संतुलन आणि सहनशक्ती वाढते; मात्र त्याचबरोबर स्नायू ताण, लिगामेंट दुखापती, गुडघे व खांद्यांच्या समस्या, पाठदुखी आणि स्ट्रेस फ्रॅक्चर यांसारख्या दुखापतींचा धोका देखील वाढतो. दुखापतीनंतरच्या पुनर्वसन प्रक्रियेमध्ये क्रीडा फिजिओथेरपी अत्यंत प्रभावी ठरते. व्यायाम उपचार, मॅन्युअल थेरपी, इलेक्ट्रोथेरपी, टेपिंग तंत्र आणि शरीराच्या हालचालींच्या वैज्ञानिक विश्लेषणाच्या माध्यमातून सैनिकांची हालचाल अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम बनविता येते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. मेघा बक्षी यांनी सहभागींना दुखापतींची कारणे, प्रारंभीची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी योग्य वॉर्म-अप आणि कूल-डाउन, शरीरस्थिती सुधारणा, लवचिकता प्रशिक्षण, स्नायू बळकटीकरण, संतुलित आहार, पुरेशी विश्रांती आणि वैज्ञानिक प्रशिक्षण पद्धतींचे महत्त्व सांगितले. शिबिरा दरम्यान गतिशीलता, संतुलन, सहनशक्ती, चपळता आणि कार्यात्मक तंदुरुस्ती वाढविण्यासाठी विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. उच्च तीव्रतेचे अंतराल प्रशिक्षण, शक्तिवर्धक व्यायाम, योग, ध्यान आणि पुनर्प्राप्ती तंत्रांचा सैनिकांच्या कार्यक्षमतेवर होणारा सकारात्मक परिणामही स्पष्ट करण्यात आला.

या शिबिराला सीआरपीएफचे प्रशिक्षणार्थी आणि सुरक्षा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यसभा सदस्य सुनेत्रा अजित पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. या जागेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, १ जून २०२६ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू होणार असून १८ जून २०२६ रोजी मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार ८ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ९ जून रोजी अर्जांची छाननी होईल, तर ११ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल. १८ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मतमोजणी करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने २० जून २०२६ पर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

## नासाला मंगळ ग्रहावर दिसली रहस्यमय अदृश्य सावली, लाल ग्रहाचे वातावरण

**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे सूर्य आग ओकतोय आणि तिकडे शांत दिसणारा मंगळ ग्रहावर विचित्र हालचाली दिसून आल्या आहेत. नासाच्या शास्त्रज्ञांना मंगळ ग्रहावर एक अदृश्य आणि विचित्र सावली दिसली आहे. या मंगळ ग्रहावरील स्थिती पाहून नासाच्या शास्त्रज्ञांनी दावा केलाय की, एका तीव्र सौर वादळानंतर मंगळ ग्रहाचे वातावरण आतून रहस्यमयरीत्या आकुंचन पावू लागलंय. नासाच्या 'मेव्हेन' या अवकाशयानाने मंगळ ग्रहावर एक अत्यंत विचित्र आणि अद्वितीय हालचाल टिपली आहे. शास्त्रज्ञांनी भीती व्यक्ती केली आहे की, कोणत्यातरी अज्ञात शक्तीमुळे मंगळाचे वातावरण आतून आकुंचन पावत आहे. विश्वाच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या ग्रहाच्या वातावरणात अशा प्रकाराचे बदल दिसून आले आहेत. मंगळ ग्रहावरील बदलामुळे मोठा धोका आहे का, काय म्हणाले शास्त्रज्ञ पाहूयात. मंगळ ग्रहावरील स्थितीला विज्ञानाच्या जगात इ्वॉन-वोल्फ प्रभाव असं संबोधल जातं. इ्वॉन-वोल्फ या स्थितीमध्ये जेव्हा चुंबकीय बलाच्या प्रभावाखाली असलेले प्रभारित कण एकमेकांवर दाबले जातात तेव्हा ही स्थिती दिसून येते. शास्त्रज्ञांनी सांगितलं की, आश्चर्याची गोष्ट म्हणजे इ्वॉन-वोल्फ प्रभाव पूर्वी ग्रहांच्या सभोवताली दिसून आला होता. पण इतिहासात पहिल्यांदात एखाद्या ग्रहावर इ्वॉन-वोल्फ प्रभाव दिसून आला आहे.

## चौराकुंड वनपरिक्षेत्रात विषारी पाण्यामुळे चार रानगव्यांचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधी :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत धारणी तालुक्यातील चौराकुंड वनपरिक्षेत्रात चार रानगवे आणि एक भेकड विषारी पाणी प्यायल्यानं दगावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

विषारी पाण्यामुळे प्राण्यांचा मृत्यू : चौराकुंड वनपरिक्षेत्रातील उत्तर अंजन झडप आणि चौराकुंड उत्तर खंड परिसरात जंगलगस्ती दरम्यान वन कर्मचाऱ्यांना प्रत्येकी तीन आणि एक असे एकूण चार रानगवे मृतावस्थेत आढळून आले. याच भागात एक भेकडही मृत अवस्थेत सापडला. रानगव्यांचा अचानक मृत्यू झाल्याची माहिती मिळताच चौराकुंड वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेरडे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. प्राथमिक माहितीनुसार, विषारी पाणी प्यायल्यानं या प्राण्यांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेनंबाबत शुक्रवारी दुपारी वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची चमू तसेच मेळघाटात कार्यरत काही स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरा चार रानगव्यांसह एका भेकडाचे शवविच्छेदन करण्यात आलं असून, प्राथमिक तपासात विषारी पाणी पिल्यामुळेच या प्राण्यांचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात आलं आहे.

वनविभागाने याप्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली : उन्हाळ्यामुळे सध्या जंगलातील नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडले आहेत. त्यामुळे वनविभागाकडून जंगलात कृत्रिम पाणवठ्यांच्या माध्यमातून वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान, उत्तर अंजन झडप आणि चौराकुंड उत्तर खंड परिसरात घडलेल्या या घटनेनंतर संबंधित पाणवठ्यांचे नमुने तसेच मृत प्राण्यांच्या शरीरातील अवयव फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत, अशी माहिती चौराकुंड वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेर्डे यांनी दिली. ही घटना अतिशय दुर्दैवी असल्याचे सांगत वनविभागाने याप्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. जंगलात शुक्रवार रात्रीपासून गस्त वाढवण्यात आली असून आजही वनकर्मचाऱ्यांकडून सतत निरीक्षण सुरू आहे. तसेच परिसरातील इतर पाणवठ्यांचेही पाणी तपासलं जात आहे. वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात असून या घटनेचा संपूर्ण तपास केला जाईल, असं वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेरडे यांनी स्पष्ट केलं.

## 'दृश्यम ३' ने बॉक्स ऑफिस हादरले; ४८ तासांत ६ सिनेमांना धोबीपछाड

**मुंबई/प्रतिनिधी :** मोहनलालचा बहुप्रतिक्षित 'दृश्यम ३'सिनेमा रिलीज होताच बॉक्स ऑफिसवर अक्षरश: वादळ घेऊन आला आहे. सस्पेन्स, थ्रिल आणि जबरदस्त कथानकामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाला डोक्यावर घेतलं आहे. अवघ्या ४८ तासांतच या सिनेमाने विक्रमी कमाई करत अनेक मोठ्या मल्याळम सिनेमांना मागे टाकलं आहे.जीतू जोसेफ दिग्दर्शित 'दृश्यम ३'ची रिलीजपूर्वीपासूनच मोठी चर्चा होती. ॲडव्हान्स बुकिंगम ध्येही सिनेमाने दमदार कामगिरी केली होती. पहिल्याच दिवशी चित्रपटाने १५.८५ कोटी रुपयांची कमाई करत शानदार ओपनिंग घेतली. दुसऱ्या दिवशी कमाईत थोडी घट झाली असली, तरी चित्रपटाने ११.०५ कोटींचं नेट कलेक्शन केलं.

## युवक-युवतींनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सृजनशिलतेला कालानुरुप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सुक्ष्म व लघु उपक्रमांना विशेष चालना दिली जात आहे.

या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राकडून बँकेच्या कर्ज मंजुरीनंतर अर्जदाराच्या जात प्रवर्ग आणि उद्योग क्षेत्रानुसार १५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते, ज्यामध्ये सेवा उद्योग, उत्पादन उद्योग तसेच कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारित उद्योग, एकाच नाममुद्रेवर (ब्रँड) आधारित संघटित साखळी विक्री केंद्र, फिरते विक्री केंद्र, खाद्यान्न केंद्र, कुक्कुट पालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिका पालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, शाकाहारी व मांसाहारी पदार्थ विक्रीचे हॉटेल किंवा ढाबा व्यवसाय, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रिडा, मासेमारी आणि प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

या योजनेमधून फिरते फळे व भाजीपाला विक्री करणारे तसेच फिरते हॉटेल व्यवसाय करणारे वाहनासाठी सुद्धा लाभ घेता येत असल्याने, लातूर जिल्ह्यातील इच्छुकांनी तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या शोरूमला भेट देऊन अशा वाहनांची चौकशी करावी आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लातूर जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असलेल्या व किमान १८ वर्षे वय पूर्ण केलेल्या स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना पात्र मानले जाईल; ज्यामध्ये सेवा उद्योगासाठी ५ लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी आणि उत्पादन उद्योगासाठी १० लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता आठवी पास असणे आवश्यक आहे.

तसेच अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही शासकीय अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा आणि या योजनेंतर्गत प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पासाठी १ कोटी रुपये (जास्तीत जास्त ५० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेत) तर सेवा उद्योग प्रकल्पासाठी ५० लाख रुपये (जास्तीत जास्त २० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेत) अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेशी संबंधित कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे, पॅनकार्ड, जातीचे प्रमाणपत्र, फूड ऑन व्हील वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, ग्रामीण भागासाठी ग्रामपंचायतीचे लोकसंख्या प्रमाणपत्र, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि फोटो या सर्व आवश्यक कागदपत्रांसह https://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक व युवतींना केले आहे.

## लातूर जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना; लातूर जिल्ह्यात २ टँकर, ७५ खाजगी विहिरींचे अधिग्रहण

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांच्या वतीने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबवल्या जात आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत जळकोट तालुक्यामध्ये तीव्र पाणी टंचाई जाणवत असल्यामुळे तिथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जळकोट तालुक्यातील २ गावे आणि १ वाडी अशा एकूण ३ ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवले जात असल्यामुळे सुमारे ३,३१० नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी शासनाचे २ टँकर कार्यरत असून त्यांच्या दररोज एकूण ४ फेऱ्या मंजूर करण्यात आल्या आहेत. या सर्व फेऱ्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या जात आहेत. प्रामुख्याने जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा - वाघमारी तांडा आणि गव्हाण येथे टँकर मंजूर करण्यात आले आहेत. टँकर व्यतिरिक्त जिल्ह्यातील इतर गावांमध्ये पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे जिल्ह्यात एकूण ६५ गावे आणि वाड्यांमध्ये ७५ विहिरी किंवा विंधन विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. अहमदपूर तालुक्यात २५ गावे व वाड्यांमध्ये ३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे, तर औसा तालुक्यात १७ गावांमध्ये २२ विहिरी, उदगीर तालुक्यात १० गावांमध्ये ११ विहिरी, चाकूर तालुक्यात ४ गावांमध्ये ४ विहिरी, रेणापूर तालुक्यात ३ गावांमध्ये ३ विहिरी, लातूर तालुक्यात १ गावात १ विहीर आणि जळकोट तालुक्यात ५ गावांमध्ये ४ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाचे पाणी टंचाई निवारण पथक संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, नागरिकांच्या मागणीनुसार तात्काळ उपाययोजना राबवण्यास कटिबद्ध असल्याचे ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत सांगण्यात आले आहे.

## एकल महिला धोरणासाठी मसुदा समिती गठीत राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व कायदेविषयक प्रश्नांचा सर्वंकष विचार करून त्यांना विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा यासाठी राज्य शासनाने "एकल महिला धोरण" तयार करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले.

राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या , राज्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित तसेच एकट्याने संसाराचा भार सांभाळणाऱ्या महिलांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. महिला व बाल विकास विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी करून मसुदा समिती गठीत केली असल्याचे



श्रीमती बोर्डीकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेनुसार या धोरणासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून त्याच्या आधारे सक्षमीकरणासाठी उपाययोजना आखण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या समितीत विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. समिती एकल महिलांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी धोरणात्मक शिफारसी करणार असून अंमलबजावणीतील अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणार आहे.

"राज्यातील एकल महिलांना सन्मानाने जगता यावे, त्यांना शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी शासन कटिबद्ध आहे. हे धोरण महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे." समितीचे कामकाज व समन्वय महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे ही श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले.

## काशिनगर देवस्थानात अधिक मासानिमीत्त अखंड शिवनाम जप आणि होम हवन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. वरवंटी शिवरस्ता परिसरातील वडगावे फार्मस आणि काशिनगर देवस्थानच्या वतीने यावर्षी आलेल्या पवित्र अधिक मास, पुरुषोत्तम मासा निमित्त अखंड शिवनाम जप आणि जनकल्याणार्थ होम हवन करण्यात आले आहे. या पवित्र दैवी कार्यात या परीसरातील अनेक भाविक भक्तांनी मोठया भक्ति भावाने सहभाग घेतला होता.

अधिक मासाचे महत्त्व

अधिक मास म्हणजे हिंदू पंचांगात दर ३ वर्षांनी येणारा १३वा महिना. याला पुरुषोत्तम मास असेही म्हणतात. अधिक मास भगवंताचा महिना : श्रीकृष्णाने या महिन्याला स्वतः चे नाव दिले. म्हणून इतर १२ महिन्यांपेक्षा हा श्रेष्ठ आहे. पुण्याचा महिना : या महिन्यात केलेले





दान, जप, व्रत, तीर्थस्नान याचे फळ १० ते १०० पट मिळते असे शास्त्र सांगते., प्रायश्चित्ताची संधी : मागच्या चुकांसाठी क्षमा मागून नव्याने सुरुवात करायला हा काळ उत्तम., आत्मशुद्धी : भौतिक कामे न करता फक्त देवकार्य, साधना करायची. म्हणून लग्न, वास्तू सारखी शुभ कामे या महिन्यात करत नाहीत. या महिन्यात काय करतात, विष्णुसहस्रनाम, भागवत वाचन, दीपदान, अन्नदान, तुळशी पूजा व, उपवास आणि एकभुक्त राहणे, नदी स्नान

वैज्ञानिक कारण : सौर आणि चांद्र वर्षात ११ दिवसांचा थोडक्यात अधिक मास पुण्यकर्माचा बोनस काळ मानला जातो.

हिंदू संस्कृतीनुसार दर तीन वर्षांनी काल गणनेत सुर्य आणि चंद्र राशींचे संक्रमण होत नाही त्यामुळे ह्या महिन्यात देवाचे नामस्मरण, जप, अन्नदान, विद्यादान आणि इतर सर्व प्रकारच्या दानांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. काशिनगर देवस्थानाचे मुख्य विश्वस्त श्री व सौ . रामभाऊ वडगावे, श्री व सौ. बाबुराव वडगावे, श्री व सौ. बसवेश्वर वडगावे आणि याच परिसरात राहणारे भाविक श्री सुरेश धूत, निलकंठ स्वामी, अनिलकुमार मळशेट्टी, मधूकर खरोसे, विष्णू डिगोळे, मल्लिकार्जुन राजमाने, शंकर भालेराव, बाबुराव गोडबोले, धनराज फुंदे, संतोष स्वामी, हरंगुळ बु. येथील श्री व सौ. वाघमारे पाटील दाम्पत्य, जगन्नाथ माने, बंडू जाधव, दशरथ बर्डे, श्री व सौ गित्ते या यजमानांनी सदरील शिवनाम जप आणि होम हवन विधीमध्ये सहभाग घेतला होता. या होम हवन विधीचे पौरोहित्य शि.वेदमूर्ती अनिल स्वामी यांनी केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.